**पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड**
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल, पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
piplanning.pcpc-mh@gov.in

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/३५१०८८ /२०२३ पिंपरी-चिंचवड दिनांक- १३/१२/२०२३

## ☆ वाहतुक नियंत्रण अधिसुचना ☆

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत नाशिक फाटा चौकामध्ये दोन लेव्हलचा जे.आर.डी टाटा उड्डाणपुल बांधण्यात आलेला आहे. सदर पुलावरुन पिंपळे गुरव कडुन पुण्याकडे जाण्याकरीता नाशिक फाटा चौकात खाली उतरणारा लुप बांधण्यात आलेला आहे. निगडी दापोडी रस्त्यावर महामेट्रो मार्गिका क्रमांक १ चे काम चालू असल्याकारणामुळे सदर लुप अद्यापपर्यंत वाहतूकीस बंद ठेवण्यात आला होता परंतु महामेट्रो मार्गीका क्रमांक १ चे काम पुर्ण झाल्याने सदर लुप चालू करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाला आहे त्याअर्थी मी बापू बांगर, पोलीस उप-आयुक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

### भोसरी वाहतुक विभाग अंतर्गत

- पिंपरी बाजुकडुन ग्रेडसेप्रेटरने व सर्व्हिस रोडने नाशिक फाटा चौकात येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **डा**वीकडे वळुन भोसरी बाजुकडे जाण्यास प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग :- १. ग्रेडसेप्रेटरने पिंपरी बाजू कडुन भोसरी,मोशी,नाशिककडे जाणाऱ्या वाहनांची एच ए कंपनी बिआरटी बसस्टॉपच्या पुढील पंक्चरने सर्व्हिस रोडला जावुन पुढे नाशिक फाटा चौकात न येता सुखवानी चेम्बर्स येथून डावे बाजूस असलेल्या मार्गाचा वापर करावा.

२. सर्व्हिस रोडने पिंपरी बाजूकडून भोसरी,मोशी,नाशिककडे जाणाऱ्या वाहनांची एच ए कंपनी बिआरटी बसस्टॉपच्या पुढील पंक्चरने सर्व्हिस रोडला जावून पुढे नाशिक फाटा चौकात न येता सुखवानी चेबर येथुन डावे बाजूस असलेल्या मार्गाचा वापर करावा.

सदरची अधिसुचना दिनांक १४/१२ /२०२३ पासुन लागु करण्यात येत आहे.

(बापू बांगर)
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :
१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर
२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
३) प्रभारी अधिकारी **भोसरी** वाहतुक विभाग, पिंपरी चिंचवड
४) कार्यकारी अभियंता, स्थापत्य प्रकल्प विभाग, पिंपरी चिंचवड
/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned with CamScanner